राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) या योजनेअंतर्गत राज्य प्रकल्प संचालनालयास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: रूसायो २०२३/प्र.क्र.१७/विशि-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २८ फेब्रुवारी, २०२३.

वाचा :

(१) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र:अर्थस-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दि. ०४.०४.२०२३
(२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F. No.२४-३७/२०२१-U. Policy (MH-GEN), दि. ०९.०१.२०२३.
(३) राज्य प्रकल्प संचालनालयाचे पत्र क्र. राप्रसं/रुसा/२०२२-२३/४३, दि. २४.०१.२०२३.

प्रस्तावना :

राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सबलीकरण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या यशस्वीतेमुळे उच्च शिक्षणाची गुणवत्ता व पाया यांचे सबलीकरण करण्यासाठी एकछत्री योजना, अभियान स्वरुपात राबविण्याकरिता केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) ही योजना राबविण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणात गुणवत्ता, सर्वदूर संधी, समानता यासाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीबाबत दि.२१.०४.२०१५ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे.

राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ही योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्य प्रकल्प संचालनालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत अकृषी विद्यापीठे व शासकीय संस्था यांना अनुदान वितरीत करण्याचे केंद्र व राज्याचे प्रमाण ६०:४० असे ठरविण्यात आलेले आहे.

राज्य प्रकल्प संचालनालयासाठी राज्यातील अकृषी विद्यापीठांना संशोधन व नाविन्यपुर्ण उपक्रम या घटकांतर्गत केंद्र हिस्सा (६०%) रक्कम रु.३१,२१,६२,५००/- च्या प्रमाणात राज्य हिस्सा (४०%) रु.२०,८१,०८,३३३/- असा एकूण रु.५२,०२,७०,८३३/- (रुपये बावन्न कोटी दोन लाख सत्तर हजार आठशे तेहत्तीस फक्त) इतकी रक्कम राज्य प्रकल्प संचालक,राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या खात्यामध्ये जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी खालील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे केंद्र हिस्सा (६०%) रक्कम रु.३१,२१,६२,५००/- च्या प्रमाणात राज्य हिस्सा (४०%) रु.२०,८१,०८,३३३/- असा एकूण रु.५२,०२,७०,८३३/- (रुपये बावन्न कोटी दोन लाख सत्तर हजार आठशे तेहत्तीस फक्त) इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या खात्यामध्ये जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विद्यापीठाचे /महाविद्यालयाचे नाव | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) रुसा १.० | | | | |
| आ) Erstwhile Model Degree Colleges(१) | | १/३% | २/३% | |
| १ | Model Degree College, Hingoli | ३३,३७,५००/- | ६६,७५,०००/- | १,००,१२,५००/- |
| **एकूण** | | **३३,३७,५००/-** | **६६,७५,०००/-** | **१,००,१२,५००/-** |
| | | | | |
| आ) विद्यापीठांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Universities) (४) | | | | |
| १ | Rashtrasant Tukadoji Maharaj, Nagpur University | ९०,००,०००/- | ६०,००,०००/- | १,५०,००,०००/- |
| २ | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad | ४०,००,०००/- | २६,६६,६६७/- | ६६,६६,६६७/- |
| ३ | Shreemati Nathaibai Damodar Thakersey University. Mumbai | ३५,००,०००/- | २३,३३,३३३/- | ५८,३३,३३३/- |
| ४ | University of Mumbai, Mumbai | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| **एकूण** | | **१,९५,००,०००/-** | **१,३०,००,०००/-** | **३,२५,००,०००/-** |
| | | | | |
| इ) महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Colleges) (४) | | | | |
| १ | KME Society's G. M. Momin Women College | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| २ | St. Xavier Institute of Education, Mumbai | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ३ | Vasantrao Naik College of Arts & Social Sciences, Nagpur | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ४ | Govt. College of Education, Aurangabad | १५,००,०००/- | १०,००,०००/- | २५,००,०००/- |
| **एकूण** | | **१,०५,००,०००/-** | **७०,००,०००/-** | **१,७५,००,०००/-** |
| | | | | |
| ई) संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रम (Research, Innovation & Quality Improvement) (३) | | | | |
| १ | Savitribai Phule University Pune | २६,२५,०००/- | १७,५०,०००/- | ४३,७५,०००/- |
| २ | Shivaji University, Kolhapur | ७५,७५,०००/- | ५०,५०,०००/- | १,२६,२५,०००/- |
| ३ | Swami Ramanand Tirth University, Nanded | ६९,७५,०००/- | ४६,५०,०००/- | १,१६,२५,०००/- |
| **एकूण** | | **१,७१,७५,०००/-** | **१,१४,५०,०००/-** | **२,८६,२५,०००/-** |
| | | | | |
| उ) Faculty Improvement (१) | | | | |
| १ | Human Resource Development Centre (Academic Staff College), University of Mumbai | ९०,००,०००/- | ६०,००,०००/- | १,५०,००,०००/- |
| **एकूण** | | **९०,००,०००/-** | **६०,००,०००/-** | **१,५०,००,०००/-** |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) रुसा २.० | | | | |
| अ) विद्यापीठांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Universities) (२) | | | | |
| १ | Dr.Babasaheb Ambedkar Technical University ,Lonere | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| २ | Sant Gadgebaba Amravati university, Amravati | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| **एकूण** | | **६,००,००,०००/-** | **४,००,००,०००/-** | **१०,००,००,०००/-** |
| | | | | |
| आ) Enhancing Quality & Excellence in Select Autonomous Colleges (१२) | | | | |
| १ | Dr. Bhanuben Mahendra Nanavati College of Home Science, Mumbai | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| २ | Chikitsak Samuhas Sir Sitaram & Lady Shantabai Patkar Collge of Arts & Science & V. P. Varde College of Commerce & Economics, Mumbai | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| ३ | Sir Parashurambhau College,Pune | १,०२,००,०००/- | ६८,००,०००/- | १,७०,००,०००/- |
| ४ | Pratap College, Amalner | ९३,००,०००/- | ६२,००,०००/- | १,५५,००,०००/- |
| ५ | Karmveer Bhaurao Patil Mahavidyalaya, Pandharpur | १,०५,००,०००/- | ७०,००,०००/- | १,७५,००,०००/- |
| ६ | Mithibai College of Arts, Chauhan Institute of Science & A. J. College of Commerce & Economics, Mumbai | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| ७ | Symbiosis College of Arts and Commerce, Pune | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| ८ | St.Xaviers Autonomous college, Mumbai | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| ९ | Tuljaram Chaturchand College of Arts Science & Commerce,Pune | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| १० | Sadguru Gadge maharaj College,Satara | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| ११ | Chhatrapati Shahu Institute of Business Education & Research, Kolhapur | ४८,००,०००/- | ३२,००,०००/- | ८०,००,०००/- |
| १२ | Chhatrapati Shivaji College, Satara | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| **एकूण** | | **९,४८,००,०००/-** | **६,३२,००,०००/-** | **१५,८०,००,०००/-** |
| | | | | |
| इ) महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Colleges) (७) | | | | |
| १ | Govt. College of Arts & Science, Aurangabad | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | Nirmala Niketan College of Home Science, Mumbai | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ३ | BPCAS College of Physical Education, Wadala, Mumbai | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ४ | Govt. Institute of Science, Aurangabad | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ५ | Shri Maharani Tarabai Govt. College of Education, Kolhapur | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ६ | Ismail Yusuf College of Arts, Science & Commerce, Mumbai | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| ७ | Nagindas Khandwala College Mumbai | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| **एकूण** | | **२,१०,००,०००/-** | **१,४०,००,०००/-** | **३,५०,००,०००/-** |
| | | | | |
| **ई) Equity Initiative (२)** | | | | |
| १ | SNDT Women's University, Mumbai | ७५,००,०००/- | ५०,००,०००/- | १,२५,००,०००/- |
| २ | Sant Gadge Baba Amravati University, Amravati | ३७,५०,०००/- | २५,००,०००/- | ६२,५०,०००/- |
| **एकूण** | | **१,१२,५०,०००/-** | **७५,००,०००/-** | **१,८७,५०,०००/-** |
| | | | | |
| **उ) नवीन आदर्श पदवी महाविद्यालय (New Model Degree College) (१)** | | | | |
| १ | New Model Degree College, Washim | ३,६०,००,०००/- | २,४०,००,०००/- | ६,००,००,०००/- |
| **एकूण** | | **३,६०,००,०००/-** | **२,४०,००,०००/-** | **६,००,००,०००/-** |
| | | | | |
| **३) MMER Grants under RUSA १.० & २.०** | | | | |
| १ | MMER Grants | २,९६,००,०००/- | १,९७,३३,३३३/- | ४,९३,३३,३३३/- |
| **एकूण** | | **२,९६,००,०००/-** | **१,९७,३३,३३३/-** | **४,९३,३३,३३३/-** |
| **एकूण (१ ते ३)** | | **३१,२१,६२,५००/-** | **२०,८१,०८,३३३/-** | **५२,०२,७०,८३३/-** |

२. या संदर्भात झालेला खर्च सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्याच्या अटीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र-१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणी करीता राज्य प्रकल्प संचालनालयाने सादर केली पाहिजेत.

३. राज्य प्रकल्प संचालनालयास केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजुर केलेला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठी करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ लेखा संहितेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत घेण्यात यावीत.

४. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्या सोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सदरची खरेदी प्रक्रिया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी आणि त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास विहित वेळेत सादर करण्यात यावे.

५. सद्य:स्थितीत राज्य प्रकल्प संचालनालयासाठी **नियंत्रक अधिकारी म्हणून** राज्य प्रकल्प संचालक, रुसा यांना व **आहरण व संवितरण अधिकारी म्हणून** राज्य प्रकल्प उप संचालक, (वित्त), रुसा यांना घोषित करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही नियंत्रक अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी.

६. केंद्र हिश्श्यावरील खर्च "मागणी क्रमांक - डब्ल्यु-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०३- शासकीय महाविद्यालये व संस्था, (०७) (०१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (६० टक्के केंद्र हिस्सा), ३१ सहायक अनुदाने वेतनेतर, (२२०२ आय २६३) तसेच राज्य हिश्श्यावरील खर्च "मागणी क्रमांक - डब्ल्यु-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०३- शासकीय महाविद्यालये व संस्था, (०७) (०२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (४० टक्के राज्य हिस्सा), ३१ सहायक अनुदाने वेतनेतर, (२२०२ आय २७२) या लेखाशिर्षाखालील सन २०२२-२३ मधील मंजूर तरतुदीतून खर्ची टाकण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२३/प्र.क्र.४३/अर्थ-३, दि. ०४ एप्रिल, २०२२ तील परिच्छेद क्र.७ व १३ मधील तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.४ व ९ मधील सूचनांची/ अटी व शर्तीची पुर्तता करुन वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२३/अर्थोपाय दि.१३.०२.२०२३ व क्र.१६८/व्यय-५ दि.१०.०२.२०२३ नुसार प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०२२८१३०९०९७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.02.28 13:12:57 +05'30'

**( अ. म. बाविस्कर )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई.

२) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

४) महालेखापाल, (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.

७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८) नियोजन विभाग (कार्यासन १४७१), मंत्रालय, मुंबई.

९) वित्त विभाग (कार्यासन व्यय-५/कार्यासन अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.

१०) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

११) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१२) उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

१३) कार्यासन अधिकारी (साशि १), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) निवड नस्ती (विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.